# मिरा भाईंदर महानगरपालिका
## नगररचना विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पूर्व).
ता.जि. ठाणे - 401 107. दूरध्वनी : 022-28121455, • E-mail Id : tp@mbmc.gov.in


जा.क्र :- मनपा/नर/ 64/2023-28 दिनांक :- 90/08/2023

**// भोगवटा दाखला //**

प्रति,

1) मे. महालक्ष्मी बिल्डर्स चे भागीदार श्री.राजेंद्र बी सिंग (विकासक)
ए/जी-003, साई गार्डन, इंद्रलोक फेस III
भाईंदर (पु.) 401105

2) मे.अनिष ॲण्ड असो (सल्लागार अभियंता)
1ला व 2 रा मजला, रामदेव एस्वेअर, दिपक हॉस्पीटल रोड,
एस.के. इंग्लिश हायस्कूलच्या बाजूला, भाईंदर (पूर्व).

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर.

**विषय - मौजे खारी, स.क्र. 170 (जुना) 33 (नविन) हि.क्र.12,13 या मंजूर रेखांकनामधील प्रस्तावित इमारत (पार्ट तळ + 7 मजले) (सल्लागार अभियंता प्रस्तावित "लक्ष्मी हाईट्स") करीता मंजुर नकाशानुसार भोगवटा दाखला मिळणेबाबत.**

संदर्भ -1) मे. अनिष ॲण्ड असो (सल्लागार अभियंता) यांचा दि.17/02/2023 रोजीचा प्रस्ताव.

2) मा.अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी मिरा भाईंदर यांचेकडील पत्र क्र. महसूल/जमिनबाब/सनद/एसआर-76/2023, दि.16/02/2023 अन्वयेची सनद.

3) मे. सक्षम प्राधिकरण, नागरी संकुलन ठाणे यांचेकडील स.क्र. 170/12 करिता आदेश क्र. यु.एल.सी./ टिए/एटीपी/कलम-20/एसआर1345/111, दि.10/02/2020 अन्वये अंतिम नाहरकत दाखला व स.क्र. 170/13 करिता नागरी जमिन कमाल धारणा कायदयाकडील 10(3) 10(5) अन्वये दुर्बल घटक योजनेची कार्यवाही झालेली नसल्याबाबत विकासकाने रु.300/- च्या स्टॅम्प पेपरवर दि.29/03/2023 अन्वये दिलेले शपथपत्र व बंधपत्र.

4) मिरा भाईंदर महानगरपालिकेकडील पत्र क्र. मनपा/नर/1517/2021-22, दि.24/08/2021 अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी.

5) मे. अनिष ॲण्ड असो (सल्लागार अभियंता) यांचा (Building Completion Certificate) दि. 16/02/2023 रोजीचा इमारत पुर्णत्वाचा दाखला.

6) मे. अनिष ॲण्ड असो यांचेकडील इमारतीचे बांधकाम तांत्रिकदृष्टया योग्य असलेबाबतचा दि.16/02/2023 रोजीचा दाखला.

7) श्री. दिलीप शर्मा यांचा दि.12/01/2023 रोजीचा प्लबींगबाबतचा दाखला.

8) साईट सुपरवायझर, श्री. विवेक सिंह यांनी जागेवरील इमारतीच्या बांधकामासाठी वापरण्यात आलेले साहित्य चांगल्या प्रतीचे असल्याबाबत दि.29/03/2023 रोजीचा दाखला.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## नगररचना विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पूर्व).
ता.जि. ठाणे - 401 107. दूरध्वनी : 022-28121455, • E-mail Id : tp@mbmc.gov.in


**जा.क्र :- मनपा/नर/** 64/2023-28 **दिनांक :-** 10/08/2023

9) महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभाग यांचेकडील पत्र क्र. मनपा/पापु/1580/2022-23 दि.05/01/2023 अन्वयेचे रेन वॉटर हार्वेस्टिंग कार्यान्वित झाल्याबाबत दाखला.
10) महानगरपालिकेचे मा. कार्यकारी अभियंता (विद्युत) यांचेकडील पत्र क्र. मनपा/विद्युत/3745/2022-23 दि.11/01/2023 अन्वये सोलार वॉटर हिटींग सिस्टीम कार्यान्वीत असल्याबाबतचा दाखला.
11) महानगरपालिकाचे उद्यान व वृक्षप्राधिकरण यांचेकडील जा.क्र. मनपा/उदयान/570/2022-23, दि.10/01/2023 अन्वये झाडांची लागवड व संगोपन केल्याबाबतचा दाखला.
12) विकासकाचे दि.11/01/2023 रोजीचे हमीपत्र.

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर.

महोदय,

विषयांकित **मौजे खारी, स.क्र. 170 (जुना) 33 (नविन) हि.क्र.12,13 या जागेतील प्रस्तावीत इमारत (पार्ट तळ + 7 मजले) (सल्लागार अभियंता प्रस्तावित "लक्ष्मी हाईट्स") क्षेत्र 1681.88 चौ.मी.** चे बांधकाम मंजुर नकाशाप्रमाणे **सल्लागार अभियंता मे. अनिष ॲण्ड असो (नोंदणी क्र. नपा/नर/194/1102/99-2000, दि.13/05/1999 ते दि.31/12/2023 पर्यंतची मुदतवाढ) व श्री. विवेक सिंह (साईट सुपरवायझर)** यांच्या देखरेखीखाली पुर्ण झालेले असून सदरचे बांधकाम तांत्रिकदृष्टया योग्य असल्याबाबत संरचना अभियंता **मे. अनिष ॲण्ड असो** व सदर इमारतीच्या प्लंबींगचे काम योग्य झालेबाबत परवानाधारक **श्री. दिलीप शर्मा** यांनी दाखले दिलेले आहेत. यास्तव सदर **वरीलप्रमाणे** च्या **रहिवास** वापराच्या इमारतीसाठी खालील अटीशर्तींच्या अधिन राहुन प्रस्तावित इमारतीसाठी मंजुर नकाशाप्रमाणे भोगवटा दाखला देण्यात येत आहे.

**अटीशर्ती -**

1) संदर्भिय पत्र क्र. 4 अन्वयेच्या सुधारीत बांधकाम परवानगी मधील अटीशर्तींचे व विकासकाच्या संदर्भ क्र. 12 अन्वयेच्या
2) हमीपत्र / शपथपत्राचे पालन करणे बंधनकारक राहिल.

जर

अ) आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आवश्यकता वाटल्यास कोणत्याही प्रकारची पुर्तता करणेस कळविल्यानंतर किंवा कोणताही प्रकारचा प्रतिबंध केल्यानंतर त्याचे पालन नाही केल्यास.

ब) आपण कोणत्याही प्रकारची माहिती लपवून किंवा चुकीची माहिती सादर करुन परवानगी / भोगवटा दाखला प्राप्त करुन घेतल्याचे आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची खात्री झालेनंतर सदरचा दाखला रद्द करणेचे अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत.

3) सदर इमारतीच्या बांधकामामध्ये भविष्यात कोणत्याही प्रकारचे फेरबदल करावयाचे झाल्यास त्याबाबत महानगरपालिकेची परवानगी प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## नगररचना विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पूर्व).
ता.जि. ठाणे - 401 107. दूरध्वनी : 022-28121455, • E-mail Id : tp@mbmc.gov.in

जा.क्र :- मनपा/नर/ ०४/2023-28 दिनांक :- 10/08/2023

4) सदरच्या दाखल्यामध्ये नमुद केलेल्या वापरा व्यतिरिक्त भविष्यात बदल केल्याचे निदर्शनास आल्यास सदरचा दाखला रद्द समजणेत येवून पुढील कार्यवाही करणेत येईल.

5) सदरच्या दाखल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 मधील कोणत्याही तरतुदी अन्वयेच्या कार्यवाहीसाठी बाधा येणार नाही.

6) सदरच्या दाखल्यामुळे अर्जदारास त्यांच्या मालकीच्या नसलेल्या कोणत्याही जमिनीचा कोणत्याही प्रकारे वापर करता येणार नाही.

7) सदर जागेच्या मालकीबाबतच्या मा. न्यायालयात सुरू असल्यास मा. न्यायालयाच्या आदेशाचे पालन करणे विकासकावर बंधनकारक राहील. त्याबाबत महानगरपालिकेची कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही.

8) अर्जदारांनी सादर केलेल्या दि.11/01/2023 रोजीच्या शपथपत्राप्रमाणे मल:निस्सारण व्यवस्था, सांडपाणी व्यवस्था, /पाणीपुरवठा व्यवस्थाबाबत देखभाल दुरुस्ती करणे बंधनकारक राहिल.

9) सदर इमारतीचा वापर सुरु करणेपुर्वी सदर दाखला वेळी सादर केलेल्या सर्व विभागाकडील नाहरकत दाखला / प्रमाणपत्र / परवानगी यामधील अटीशर्तीची पुर्तता करणे बंधनकारक राहिल.

10) संदर्भिय पत्र क्र. 12 मधील हमीपत्रांचे / शपथपत्राचे पालन करणे आपणांवर बंधनकारक राहिल.

11) रेखांकनामधील वाहनतळाची जागा कायमस्वरुपी सार्वजनिक वापरासाठी खुली ठेवणे बंधनकारक राहिल.

(मा. आयुक्त तथा प्रशासक सो यांचे मान्यतेने..)

(केशव शिंदे)
प्र. सहायक संचालक, नगररचना
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर.

प्रत - 1) कर संकलक व निर्धारक
2) विभाग प्रमुख, अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग

BHOGAVATA DAKHALA-ORDER-2023-S.P.